अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# अतिरेक्यांना अटक मुंबईसाठी हायअॅलर्ट

मलेशियन विमान बेपत्ता होण्याच्या प्रकाराबाबत अजूनही जगभर आश्चर्य व्यक्त होत आहे. त्यामागे दहशतवादी कारवाया असण्याची शक्यताही व्यक्त झाली. भारताच्या संदर्भात ही गोष्ट अधिक चिंतेची ठरते असे आम्ही यापूर्वीच म्हटले होते. भारतात दहशतवाद्यांचे जाळे किती व्यवस्थित काम करीत आहे हे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. म्हणूनच मलेशियन विमान बेपत्ता होण्यामागे दहशतवादी घातपाताची जास्त शक्यता आहे. त्या दहशतवाद्यांचे भारतातील दहशतवाद्यांशीही संबंध असू शकतात. नुकत्याच पकडल्या गेलेल्या इंडियन मुजाहिदीनच्या तीन दहशतवाद्यांनी दिलेल्या कबुलीवरून भारतात मोठा हल्ला घडवून आणण्याचा त्यांचा कट होता. अशाच त्यांच्या मोठ्या कटाचा भाग म्हणून हे पळवले गेलेले विमान भारतात एखाद्या इमारतीवर किंवा महत्त्वपूर्ण ठिकाणावर आदळवले जाण्याची दहशतवाद्यांची योजना असू शकते. कारण भारतात एकूणच दहशतवादाचा धाक कायम ठेवणे त्यांना सोपे जाते. राजस्थानात झिया ऊर रहेमान याच्यासह तिघांना अनेक स्फोटकांसह अटक केली गेली. रहेमान हा मुंबईतल्या वांद्रे स्थानकावरून निघालेल्या रेल्वेने अजमेर येथे पोहचला होता. मुंबईत १३ जुलै ११ रोजी झालेल्या तिहेरी साखळी बॉम्बस्फोटात त्याचा हात होता. त्यानंतर तब्बल ४ वर्षे तो अगदी बिनधास्तपणे भारतात आपली कारस्थाने करीत होता. मुंबईतल्या स्फोटाशी त्याचा असलेला संबंध पाहिल्यावर मुंबईत किंवा महाराष्ट्राच्या अन्य भागांत इंडियन मुजाहिदीन या दहशतवादी संघटनेचे चांगलेच जाळे निर्माण झालेले आहे हे सिध्द होते. सर्वात महत्त्वाची आणि धक्कादायक गोष्ट म्हणजे मुंबई किंवा महाराष्ट्रात काही स्थानिक हात या दहशतवाद्यांना आश्रय देत आहेत. हे यानिमित्ताने उघड होते. कारण २०११ चे बॉम्बस्फोट घडवून हे दहशतवादी इतके दिवस सहिसलामत राहिले याचाच अर्थ त्यांना मुंबईहून पुरेशी मदत मिळाली हे लपून राहात नाही. आता देखील हा झिया ऊर रहेमान मुंबईतूनच राजस्थानात रेल्वेने गेला. तेव्हा महाराष्ट्रातला इंटलिजन्स ब्यूरो काय करीत होता. रेल्वे स्थानकावर अनेक प्रकारचे इंडिकेटर, सी सी टीव्ही कॅमेरे असतात. स्फोटके शोधण्याची यंत्रणा असते. अशा दहशतवाद्यांना शोधण्यासाठी तरबेज असे श्वानपथक तयार असते. असे असताना या झिया उर रहेमान आणि त्याच्या साथीदारांनी कोणालाही पत्ता लागू न देता आपल्या कारवाया चालू ठेवल्या होत्या. या सगळ्या घटनाक्रमावरून आणखी एक गोष्ट उघड होते ती म्हणजे मुंबईवरचा दहशतवादाचा धोका अजूनही तसाच कायम आहे. कारण इंडियन मुजाहिदीनच्या अनेक दहशतवाद्यांनी मुंबईत आणि महाराष्ट्राच्या अनेक भागांत योजनाबध्द पध्दतीने आपली केंद्र निर्माण केली असून ते आणि त्यांचे समर्थक इथे व्यवस्थितपणे मुक्काम ठोकून आहेत. मुंबई संदर्भातला हा धोका या निमित्ताने पुन्हा प्रकाशझोतात आलेला आहे. खरे तर या दहशतवाद्यांना झालेली अटक म्हणजे मुंबईसाठी सर्वात मोठी रेड अॅलर्टच आहे. त्यातून तातडीने सुरक्षा यंत्रणांनी सावध झाले पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे ज्या स्थानिकांच्या आश्रयाने इंडियन मुजाहिदीनने इथे तळ ठोकला आहे तो कायमचा उद्‌ध्वस्त केला पाहिजे.

### पाकच्या कटाचे भारतात पोशिंदे

ज्या काळात आणि वेळेत या दहशतवाद्यांना अटक झाली हे देखील खूप महत्त्वाचे ठरते. राजस्थानात नरेंद्र मोदी सभा घेणार होते आणि त्या सभेत स्फोट घडवून आणण्याची त्यांची योजना होती. या सर्व दहशतवादी हल्ल्यांचा आणि स्फोटांमागचा सूत्रधार असलेल्या रहमानने लोकसभा निवडणूक काळात मोठा हल्ला घडवण्याचा कट आखण्यात आला होता असे कबूलच केले आहे. म्हणजे ज्या काळात देशातील सर्वच राज्यांतील पोलीस किंवा सुरक्षा यंत्रणांचा फौजफाटा निवडणूक कामात व्यस्त असतो त्या काळातच आपला कार्यभाग उरकण्याचा त्यांचा बेत होता. निवडणूक शांततेत पार पडावी म्हणून दक्षता घेतली जाते. या काळात पोलिसांकडून दुर्लक्ष होण्याची शक्यता असल्याने ती संधी साधण्याचा रहमान आणि त्याच्या टोळीचा बेत होता. परंतु उशिरा का असेना परंतु इंटलिजन्स ब्यूरो आणि अन्य सुरक्षा यंत्रणांच्या सावधानतेमुळे मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला गेला. त्या दहशतवाद्यांच्या अटकेमुळे पुणे इथल्या २०१२ च्या जे एम रोडवरच्या आणि वाराणसीच्या शितला घाटावर २०१० साली बॉम्ब पेरल्याच्या घटनांचाही उलगडा झाला. सप्टेंबर २०१० मध्येच दिल्लीत जामा मशिदीतल्या गोळीबारात दोन परदेशी नागरिक जखमी होण्याचा प्रकार घडला होता. त्यातही याच टोळीचा हात असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी या कामात मिळवलेले यश चांगलेच आहे परंतु यापेक्षाही अधिक सतर्कता आणि वेग आवश्यक आहे. २०१० पासून हे अतिरेकी अगदी उजळ माथ्याने जागोजागी स्फोट घडवित राहिले आणि आपल्या पोलिसांना त्याचा मागमूसही लागू नये ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी ठरते. देशाच्या सुरक्षिततेसाठी अशा प्रकारची दिरंगाई किंवा हेळसांड अक्षम्य मानायला हवी. हीच गोष्ट अमेरिकेसारख्या देशात घडली असती तर अगदी वर्षभरात या दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले गेले असते. त्यांना मदत करणाऱ्यांना थेट हद्दपार केले असते. आतापर्यंत अमेरिकेने या दहशतवादी संकटाशी अत्यंत कठोरपणे मुकाबला केला आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर अमेरिकेने घेतलेली खबरदारी तिथल्या दहशतवादी कारवायांना मोठा लगाम घालणारी ठरली, तशा प्रकारची खबरदारी भारताकडून अजूनही घेतली जात नाही.

### कट उधळला धोका कायम

लोकसभा निवडणुकीपूर्वी दहशतवादी हल्ला केल्याने इंडियन मुजाहिदीनचे दोन उद्देश साध्य होणार होते. एक म्हणजे जिहादचा नारा देऊन भारतात धार्मिक विद्वेष निर्माण करायचा आणि भारतात आर्थिक राजकीय अस्थिरता निर्माण करायची हे दोन्ही कट उधळले गेले याचा अर्थ दहशतवादाचा धोका टळलेला नाही. उलट कट उधळला पण धोका कायम आहे. हे दाखवणारीच ती घटना आहे. खरे तर या दहशतवाद्यांच्या अटकेमुळे अनेक गोष्टींचा पंचनामाच झाला. आपल्या सुरक्षा यंत्रणा कशा झोपलेल्या आहेत हे दिसून आले. पाकिस्तानात पैदा झालेला दहशतवाद भारतात काही स्थानिक पाक धार्जिण्यांकडून कसा व्यवस्थितपणे पोसला जातोय हेही उघड झाले. सर्वप्रकारच्या आधुनिक यंत्रणा मनुष्यबळ असताना त्या सर्वांपेक्षा दहशतवादी वरचढ असल्याचे यानिमित्ताने पहायला मिळाले आणि या भयावह अशा संकटाशी दोन हात करण्याची इच्छाशक्तीच आपल्या सत्ताधाऱ्यांमध्ये नाही, असेही या घटनेवरून सिध्द होते. अजूनही किती काळ दहशतवादाला आणि त्याच्या पोशिंद्यांना आपण मोकळे रान देणार आहोत, अजून किती वेळा अशी कटकारस्थाने उधळण्यावर समाधान मानणार आहोत, किंबहुना अजून किती दहशतवादी हल्ले आपण स्वत: ओढवून घेणार आहोत असे मूलभूत प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. त्याची उत्तरे आज ना उद्या प्रामाणिकपणे द्यावी लागतील. बाहेरून आलेले हे संकट जर देशातही काही देशद्रोह्यांकडून पोसले जाणार असेल तर त्याचा सणसणीत समाचार घ्यावा लागेल. अमेरिकेप्रमाणे पाकिस्तानातल्या दहशतवादी तत्त्वावर हल्ला करण्याचे धैर्य भारत कधीही दाखवणार नाही. परंतु आपल्याच देशाच्या कानाकोपऱ्यात तळ ठोकणाऱ्यांचे तळ तरी उद्‌ध्वस्त करणार की नाही हे कायमचे ठरवावे लागेल. चार वर्षे भारतात फिरत राहणाऱ्या या दहशतवाद्यांनी हे प्रश्न उपस्थित केले आहेत.